# श्वान केंद्राबाबत

वसई विरार शहर महानगरपालिका स्थापनेनंतर संपुर्ण महानगरपालिका क्षेत्रासाठी वसई पूर्व प्रभाग समिती "डी" येथे दि. १४/१०/२०११ रोजी १६० पिंजऱ्यांच्या क्षमतेचे एक श्वान निर्बीजीकरण केंद्र महानगरपालिकेमार्फत उभारण्यात आले आहे. सदर श्वान निर्बीजीकरण केंद्रामध्येच श्वानांवर निर्बीजीकरण शस्त्रक्रिया करणे, जखमी श्वानांना पकडून त्यांच्यावर औषध उपचार करणे, तसेच श्वानांना रेबिस लस देणे इत्यादी कामासाठी ठेकेदार मे. प्रतापराव राणे एज्युकेशनल चॅरिटेबल ट्रस्ट यांची दि. ०७/०४/२०२५ ते दि. ०६/०४/२०२८पर्यंत नियुक्ती करण्यात आलेली आहे. त्यानुसार त्यांचेमार्फत मनपा क्षेत्रातील भटक्या व मोकाट श्वानांचे निर्बिजीकरण व रेबीज रोगाचे लसीकरण, जखमी श्वानांना पकडून उपचार करण्यात येतो.

| Sr. No. | Name | Veterinaries | Dog Catching Personnel | Specially Modified Vehicle | Cages | Other Staff |
|---|---|---|---|---|---|---|
| १ | Prataprao Rane Educational Charitable Trust | ३ Surgeon | ३ | २ | १६० | LSS-३, Driver – २, Cleaning – १, Feeder – १ |

परंतु, सद्यस्थितीत श्वानांची अंदाजित संख्या ८० हजार ते १ लक्ष किंवा त्यापेक्षा जास्त असण्याची शक्यता असून शहरातील श्वानांची वाढती संख्या लक्षात घेता वसई विरार शहर महानगरपालिकेने भटक्या व मोकाट श्वानांचे निर्बिजीकरण व रेबीज रोगाचे लसीकरण करणे, जखमी श्वानांना पकडून उपचार करणेकरिता स्वतःच्या अथवा भाड्याच्या जागेवर श्वानांसाठी निवारा उभारून सदर ठिकाणी भटक्या व मोकाट श्वानांची नसबंदी शस्त्रक्रिया करणे याकामाकरीत स्वारस्य अभिव्यक्ती निवेदन (EOI) मध्ये मे. जेनिस स्मिथ ॲनिमल वेलफेअर ट्रस्ट यांचेमार्फत स्टोर नंबर २, ड्रिम इंडस्ट्रियल पार्क, काशीद कोपर, सर्वे नं. ५९ बी, विरार (पुर्व) या ठिकाणी श्वान निर्बिजीकरण केंद्र उभारणेबाबतचा कार्यादेश दि. २९/११/२०२४ ते २८/११/२०२७ देण्यात आला असून सदर ठेकेदारामार्फत मनपा क्षेत्रातील भटक्या श्वानांना पकडणे, त्यांचेवर निर्बिजीकरण शस्त्रक्रिया, खानपान व्यवस्था करणे व पून्हा जागेवर सोडणे इत्यादी कामे करण्यात येतात.

| Sr. No. | Name | Veterinaries | Dog Catching Personnel | Specially Modified Vehicle | Cages | Other Staff |
|---|---|---|---|---|---|---|
| १ | Janice Smith Animal Welfare Trust | ३ Surgeon | ८ | २ | १८० | LSS-१, Driver – २, Cleaning – ६, Feeder – १ |

- तसेच सदर केंद्रावरील कामकाजावर देखरेख व नियंत्रण ठेवणेसाठी ABC देखरेख व नियंत्रण समितीची स्थापना दि. १८/०८/२०२३ रोजी करण्यात आलेली आहे.
- सदर समितीच्या आजतागायत सहा बैठका घेण्यात आलेली आहेत.
- तसेच सदर केंदावरील श्वानांची निर्बिजीकरण शस्त्रक्रिया झाल्यानंतरचे अवयव मोजणे व त्यांची शास्त्रोक्त पद्धतीने विल्हेवाट लावणेसाठी दि. १२/१२/२०२४ रोजी अवयव मोजणी समिती गठीत करण्यात आलेली आहे.
- तसेच वसई विरार शहर महानगरपालिका क्षेत्रातील भटक्या व जखमी श्वानांपासून होणारा रेबीजचा धोका कमी करणेसाठी व त्यापासून मानवी मृत्युंचे प्रमाण कमी करण्याचे उद्दिष्ट साधणेसाठी वसई विरार शहर महानगरपालिका क्षेत्रात मिशन रेबीज या संस्थेमार्फत मोफत रेबीज नियंत्रण उपक्रम माहे ऑगस्ट २०२५ पासुन सुरु करण्यात आला आहे.
- सदर संस्थेमार्फत सुमारे १५७४१ भटक्या श्वानांना रेबिज लसीकरण करण्यात आलेले आहे.
- तसेच सदर संस्थेमार्फत मनपा क्षेत्रातील विविध शाळांमध्ये भटक्या श्वानांपासुन होणाऱ्या रेबीज रोगाबाबत व त्यावर करावयाचा औषध उपचार व इतर उपाययोजना बाबत जनजागृती करण्याची कामे देखील सुरु आहेत.
- मनपा क्षेत्रातील श्वानांबाबत तक्रार निवारण करणेसाठी **१८००-२३३-०३११** हा टोल फ्रि नंबर देण्यात आलेला आहे.
- तसेच वसई विरार शहर महानगरपालिका क्षेत्रातील भटक्या व जखमी श्वानांपासून होणारा रेबीजचा धोका कमी करणेसाठी व त्यापासून मानवी मृत्युंचे प्रमाण कमी करण्याचे उद्दिष्ट साधणेसाठी वसई विरार शहर महानगरपालिका क्षेत्रात मिशन रेबीज या संस्थेमार्फत मोफत रेबीज नियंत्रण उपक्रम माहे ऑगस्ट २०२५ पासुन सुरु करण्यात आला आहे. सदर संस्थेमार्फत सुमारे १५७४१ भटक्या श्वानांना रेबिज लसीकरण करण्यात आलेले आहे. तसेच सदर संस्थेमार्फत मनपा क्षेत्रातील विविध शाळांमध्ये भटक्या श्वानांपासुन होणाऱ्या रेबीज रोगाबाबत व त्यावर करावयाचा औषध उपचार व इतर उपाययोजना बाबत जनजागृती करण्याची कामे देखील सुरु आहेत.
- मा. सर्वोच्च न्यायालय, दिल्ली येथे दाखल सुमोटो याचिका क्र.०५/२०२५ च्या संदर्भात मा. सर्वोच्च न्यायालयाने वेळोवेळी दिलेल्या निर्देशाचे अनुपालन करणेच्या अनुषंगाने वसई विरार शहर महानगरपालिका क्षेत्रातील सर्व सरकारी आणि खाजगी शैक्षणिक संस्था, रुग्णालये (जिल्हा रुग्णालये, प्राथमिक आरोग्य केंद्रे आणि वैद्यकीय महाविद्यालये यासह), स्टेडियम, बस सार्वजनिक क्रीडा संकुल किंवा बस डेपो आणि रेल्वे स्थानके इत्यादी परिसरात आढळणाऱ्या प्रत्येक भटक्या श्वानांना पकडून त्यांचे निर्बीजीकरण आणि लसीकरणानंतर नियुक्त केलेल्या निवाऱ्यांमध्ये हलविण्याकरिता मनपा क्षेत्रात निवारा केंद्र बांधणेसाठी मा. महासभेची मान्यता घेण्यात आलेली असून त्यानुसार पुढील कार्यवाही सुरु आहे.

# श्वान निर्बिजीकरण व लसीकरण माहिती

| अ.क्र. | सन | श्वानांची संख्या | खर्च | ठेकेदाराचे नाव |
|---|---|---|---|---|
| १ | २०२१ | ५०६५ | ८१,८०,५५० | मे. आर रोमिंग पाव्स फाऊंडेशन |
| २ | २०२२ | २१८७ | ३५,३१,३९० | मे. आर रोमिंग पाव्स फाऊंडेशन |
| ३ | २०२३ | ३७८५ | ५५,१२,१०७ | मे. आर रोमिंग पाव्स फाऊंडेशन |
| ४ | २०२४ | ४४४३ | ६३,८२,५२५ | मे. आर रोमिंग पाव्स फाऊंडेशन |
| ५ | २०२५ | ११७३ | १७,८५,५२६ | मे. आर रोमिंग पाव्स फाऊंडेशन |
| ६ | २०२५ | ५०९९ | ८४,१८,४४९ | मे. जेनिस स्मित ॲनिमल वेलफेअर ट्रस्ट |
| ७ | २०२५-२६ | ५९२२ | ९६,४१,८९१ | मे. प्रतापराव राणे एज्युकेशनल आणि चॅरीटेबल ट्रस्ट |
| एकुण शस्त्रक्रिया | | २७,६७४ | ४,३४,५२,४३८ | |
| मिशन रेबीज या संस्थेमार्फत मोफत लसीकरण | | १५,७४१ | | |
| एकुण लसीकरण | | ४३,४१५ | | |